# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.11.2024** **वार – मंगळवार**

---

**मतदान**

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातल्या 288 मतदार संघात उद्या मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया सुलभ व्हावी आणि मतदानाच्या टक्केवारीता वाढ व्हावी यासाठी प्रशासन सज्ज आहे, असं पुण्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी काल सांगितलं. निवडणुका निर्भय, भयमुक्त, निःपक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनानं आवश्यक सर्व उपाययोजना केल्या आहेत; विविध राजकीय पक्षांनी देखील यासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन डॉ. दिवसे यांनी केलं आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीबरोबर झालेल्या बैठकीत ते काल बोलत होते.

मतदानाची गोपनीयता राखण्याकरीता 20 नोव्हेंबर रोजी मतदान केंद्र तसंच 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी केंद्राच्या 100 मीटरच्या आवारात कोणताही मोबाईल, स्मार्टवॉच, पेन कॅमेरा आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, शस्त्र घेऊन येण्यास पूर्णत: बंदी आहे. त्यामुळे मोबाईल आदी इलेक्ट्रॉनिक उपकरणे मतदान केंद्राच्या 100 मीटरच्या अंतराच्या बाहेरच ठेवावीत, असं दिवसे यांनी सांगितलं. त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी मतदान करावं आणि आपल्या परिसरातील पात्र मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करावं असं आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी केलं.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करता यावं यासाठी उद्या 20 नोव्हेंबरला उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागांतर्गत सर्व आस्थापनांतील अधिकारी, कर्मचारी, कामगारांना भरपगारी सुट्टी देण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत, अशी माहितीही डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. मतदान केंद्रांवर दिव्यांग व्यक्ती आणि जेष्ठ नागरिकांना व्हील चेअर्स, मॅग्नीफाईंग ग्लास, रॅम्प, वाहन व्यवस्था, स्वयंसेवकाची नेमणूक आदी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, त्यामुळे सर्व पात्र दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांनी मतदान करावं असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**पिंपरी चिंचवड**

पिंपरी, भोसरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना त्यांच्या मतदान केंद्राबाबतची माहिती देण्यासाठी महापालिकेने 'नो यूवर पोलिंग स्टेशन' ही सेवा सुरु केली आहे. आतापर्यंत 2318 नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे, अशी माहिती आयुक्त आणि प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे. मतदान केंद्र, बदललेले मतदान केंद्र, नावातील बदल यासाठी मतदारांनी महापालिकेच्या सारथी हेल्पलाईन क्रमांक 8888006666 किंवा 020-67339999 यावर संपर्क साधावा, असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**राज्य परिवहन महामंडळ**

राज्यात उद्या होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाचं साहित्य आणि कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने राज्य परिवहन महामंडळाच्या नऊ हजार 232 एसटी गाड्या आरक्षित केल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील मतदारसंघात जाण्याकरिता 490 एसटी आरक्षित केल्या आहेत. पुणे विभागाच्या ताफ्यात 890 एसटी बस आहेत; त्यापैकी 490 बस या निवडणुकीच्या कामासाठी वापरल्या जात आहेत. त्यामुळे प्रवासी सेवेत 400 बस उपलब्ध असणार आहे. त्यामुळे या

दोन दिवसात बसगाड्यांची संख्या कमी आहे; या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये, म्हणून एसटी प्रशासनाने कमी प्रतिसाद असलेल्या मार्गावरच्या फेऱ्या रद्द करून त्या जास्त प्रतिसाद असलेल्या मार्गावर सोडण्याचं नियोजन केलं आहे.

**प्रतिज्ञा**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक संस्था संघटना मतदान जनजागृती करत आहेत. यशस्वी एकेडमी फॉर स्किल्स संस्थेच्या विद्यार्थी आणि प्रशिक्षक वर्गाने देखील मतदान करण्याविषयीचा आपला निर्धार पक्का केला आहे. संस्थेच्या शिवाजीनगर इथल्या कार्यालयात उपस्थितांना मतदान करण्याची सामूहिक प्रतिज्ञा देण्यात आली.

**जयंती**

देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज जयंती आहे. या निमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन केलं. यावेळी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यात आली.

**उद्घाटन**

संविधान हाच खरा धर्म असून त्याचं आचरण करणं हेच धर्म आचरण आहे, असे विचार सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रसन्न वरळे यांनी पुण्यात व्यक्त केले. अलार्ड युनिव्हर्सिटीतर्फे नव्याने सुरु करण्यात आलेल्या विधी महाविद्यालयाचं उद्घाटन वरळे यांच्या हस्ते करण्यात आलं; त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विधी क्षेत्रातील अनेक तज्ञ मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**प्रदर्शन**

महाराष्ट्र नर्सरीमेन असोसिएशननं पुण्यातल्या कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय फुलोत्पादन प्रदर्शनाचं आयोजन येत्या 21 ते 24 नोव्हेंबर या कालावधीत केलं आहे. या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या वनस्पती तसेच बागकाम क्षेत्रातल्या नवनवीन गोष्टी बघायला मिळणार आहेत. या क्षेत्रातील देशातले आणि परदेशातले शेतकरी, व्यावसायिक प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. हॉर्टिकल्चर क्षेत्रामध्ये रोजगार आणि व्यवसायाच्या अनेक संधींची माहिती दिली जाईल. हे प्रदर्शन सकाळी 10 ते 7 पर्यंत सर्वांसाठी खुले असेल.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश मुख्यतः निरभ्र असेल; आणि किमान तापमान 13 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**